**महाराष्ट्र लेखा लिपीक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोषागार लिपीकांना कालबध्द पदोन्नती योजनेतंर्गत देण्यात आलेल्या उपलेखापाल पदावरील वेतनाच्या वसुलीबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.**
**ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट, ३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग,**
**बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.**

क्र.संलेको-११-२०१८/प्रशा-राप-सलेअ/टिस-१/न.क्र.२०१८-२/उपलेखापाल/आप्रयो/वसुली/1267
दिनांक : 26 NOV 2018

संदर्भ:

१. वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेवाप्र-१२.०२/प्र.क्र.१५८/कोषा.प्रशा.४, दि.२६.१०.२००४.
२. वित्त विभाग शासन निर्णय क्र.न्यासप्र ११.०७/प्र.क्र.३४/कोषा (प्र-३), दि.११.०९.२००८.
३. संचालनालयाचे पत्र क्र. एमएएस २०१५/प्र.क्र.१९१६/स.अ.१/प्रशा.कोषा/३१३, दि.२०.०५.२०१५.
४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.०४.०८.२०१५ व दि.१८.०६.२०१८ रोजीचा न्यायनिर्णय.
५. संचालनालयाचे पत्र क्र.संलेको-०४-२०१८/प्रशा-राप-सलेअ/टिस-१/न.क्र.९६-१६/उपलेखापाल/आप्रयो/वसुली/३०९, दि.१८.०४.२०१८.
६. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचा दि.२०.०९.२०१८ रोजीचा न्यायनिर्णय.

## परिपत्रक

शासन वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये कनिष्ठ लिपीक या पदावरून उपलेखापाल या पदाची वेतनश्रेणीचा कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आला होता. परंतु सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये प्रारंभापासून मागे घेतला आहे.

त्यानुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या दि.१८.०६.२०१८ रोजीच्या न्यायनिर्णयान्वये सदरचा लाभ प्राप्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांची दि.११.०९.२००८ पासून वसुली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परंतु मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय येथे अपील दाखल करण्यात आले असता, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या (याचिका क्र.२५०४८/२०१८) दि.२०.०९.२०१८ च्या न्यायनिर्णयान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.१८.०६.२०१८ च्या सदरचा लाभ प्राप्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांची दि.११.०९.२००८ पासून वसुली करण्याच्या न्यायनिर्णयास स्थगिती दिली आहे.

संचालनालयाच्या संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र लेखा लिपीक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोषागार लिपीकास कालबध्द पदोन्नती योजनेतंर्गत उपलेखापाल पदाची वेतनश्रेणी लागू केलेल्या कर्मचाऱ्यांची पुर्नवेतननिश्चीती वसुलीबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना सर्व विभागीय सहसंचालक कार्यालयास देण्यात आलेल्या आहेत. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.०४.०८.२०१५ च्या निर्णयान्वये सदर प्रकरणातील कर्मचाऱ्यांची वसुली न करता पुर्नवेतनिश्चीती करण्याचे आदेश देण्यात आले होते.

तसेच, असे निदर्शनास आले आहे की, दि. २६.१०.२००४ च्या शासन निर्णयान्वये कोषागार लिपीक या पदावरून उपलेखापाल पदावरील वेतनश्रेणीचा कालबध्द पदोन्नती योजनेचा लाभ घेतलेले जे कर्मचारी



Scanned by CamScanner

सद्यस्थितीत महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील उपकोषागार अधिकारी / सहाय्यक लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी व उपलेखापाल या पदावर कार्यरत आहेत अशा कर्मचाऱ्यांची पुर्नवेतननिश्चीती विषयांकित प्रकरणानुसार अद्याप करण्यात आलेली नाही. त्यामुळे ज्या कार्यरत कर्मचाऱ्यांना हा लाभ देण्यात आला आहे अशा लाभार्थी कर्मचाऱ्याच्याबाबतीत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात येत आहेत.

१. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे जोपर्यंत त्यावर मा. सर्वोच्च न्यायालय / शासन यांचेकडून आदेश प्राप्त होत नाही तोपर्यंत मा. उच्च न्यायलय, मुंबई यांच्या दि.०४.०८.२०१५ च्या निर्णयान्वये अशा लाभार्थी कर्मचाऱ्यांची वित्त विभाग दि.२६.१०.२००४ अन्वये देण्यात आलेला कालबध्द पदोन्नतीचा लाभ काढून पुर्नवेतननिश्चीती करून त्याची नोंद त्यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. अन्यथा अशा कर्मचाऱ्यांची / अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चीती किंवा सेवानिवृत्तीवेतन प्रकरण चुकीच्या पध्दतीने महालेखापाल कार्यालयास सादर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच **सदर वेतननिश्चतीच्या अनुषंगाने अतिप्रदान झालेल्या रक्कमेच्या वसुलीस मा. सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती असल्याने सद्यस्थितीत त्यांच्याकडून कोणतीही वसुली करण्यात येऊ नये.** मात्र सुधारीत वेतननिश्चितीच्या अनुषंगाने वसुलपात्र रक्कमेची परिगणना करून त्याची नोंद सेवापुस्तकात घेऊन सोबत जोडलेल्या नमुन्यातील हमीपत्र घेऊन सेवा पुस्तकात जोडावे.

२. तसेच ज्या लाभार्थी कर्मचाऱ्यांची सेवा निवृत्ती समीप आली आहे अशा कर्मचाऱ्याचे ना विभागीय चौकशी व ना मागणी प्रमाणपत्र त्यांची पुर्नवेतननिश्चीती करून वसुलीपात्र रकमेचा उल्लेख करून सादर करण्याची दक्षता घ्यावी. वसुलपात्र रक्कमेची नोंद सदर कर्मचाऱ्यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी. तसेच त्यांच्याकडून सोबत जोडलेल्या नमुन्यातील हमीपत्र घेऊन सेवा पुस्तकात जोडावे व सदर हमीपत्राची एक प्रत ना विभागीय चौकशी व ना मागणी प्रमाणपत्रा सोबत संचालनालयास सादर करण्यात यावी. त्यानंतरच सदर कर्मचाऱ्यांना त्यांनी सादर केलेल्या हमीपत्राच्या अधीन राहून संचालनालयाकडून अंतिम ना विभागीय चौकशी व ना मागणी प्रमाणपत्र देण्यात येईल.

तथापि, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील सेवा निवृत्त होणाऱ्या / झालेल्या अधिकाऱ्यांचे निवृत्ती वेतन प्रकरणे संचालनालयाकडून देण्यात येणाऱ्या अंतिम ना विभागीय चौकशी व ना मागणी प्रमाणपत्रा शिवाय महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे. तरी सर्व कार्यालय प्रमुखांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सेवा निवृत्त होणाऱ्या / झालेल्या अधिकाऱ्यांचे संदर्भात संचालनालयाकडून अंतिम ना विभागीय चौकशी व ना मागणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच त्यांचे निवृत्ती वेतन प्रकरण महालेखापाल कार्यालयास मंजुरी करिता सादर करावे.

३. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप / अराप) सहाय्यक लेखा अधिकारी तसेच उपलेखापाल संवर्गातील नियतवयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या लाभार्थी कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही वित्त विभाग दि.२६.१०.२००४ अन्वये देण्यात आलेला कालबध्द पदोन्नतीचा लाभ काढून पुर्नवेतननिश्चीती करून त्याची नोंद त्यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. तसेच सदर वेतननिश्चतीच्या अनुषंगाने अतिप्रदान झालेल्या रक्कमेची परिगणाना करून त्याची नोंद सेवापुस्तकात घेऊन सोबत जोडलेल्या नमुन्यातील हमीपत्र घेऊन सेवा पुस्तकात जोडावे. अतिप्रदान झालेल्या रक्कमेच्या वसुलीस मा. सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती असल्याने सद्यस्थितीत त्यांच्याकडून कोणतीही वसुली करण्यात येऊ नये. मात्र सुधारित वेतननिश्चतीनुसार त्यांचे निवृत्ती वेतन प्रकरण महालेखापाल मुंबई / नागपुर कार्यालयास फेरसादर करण्यात यावे.



Scanned by CamScanner

४. सर्व विभागीय सहसंचालक / कोषागार अधिकारी / संबंधित अधिकाऱ्यांचे कार्यालय प्रमुख यांनी उपरोक्त क्र.१ ते ३ बाबतीत माहे मे-२०१५ ते सप्टेंबर-२०१८ पर्यंतचा एकत्रित अहवाल व तद्नंतर माहे ऑक्टोबर-२०१८ पासून त्रैमासिक अहवाल सोबत जोडलेल्या नमुन्यात महिन्याच्या १० तारखेपर्यंत संचालनालयास सादर करावा. उपलेखापालांच्या बाबतीत संचालनालयातील प्रशा-कोषा शाखेस व सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रशासन सलेअ शाखेस अहवाल सादर करावा.

(ज. रे. मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned by CamScanner